महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ च्या कलम २३ अन्वये खाजगी सुरक्षा रक्षक एजन्सीमार्फत विविध आस्थापनांमध्ये कार्यरत असलेल्या "सुरक्षा रक्षकांना द्यावयाची सुट" बाबतचे प्रस्ताव सादर करण्याच्या कार्यपध्दतीबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, उर्जा व कामगार विभाग**
**शासन निर्णय क्र. एसजीए- २०१९ /प्र.क्र.१५४/कामगार-५**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १८ सप्टेंबर, २०१९

वाचा :- १) शासन निर्णय क्र.एसजीए-१५१२/प्र.क्र.३०/ कामगार-५, दि. १७ जुलै, २०१२.
२) शासन निर्णय क्र.एसजीए- २०१३/प्र.क्र.३४१/ कामगार-५, दि. २१ ऑक्टोबर, २०१३.
३) शासन निर्णय क्र.एसजीए- २०१३/प्र.क्र.१८९/ कामगार-५, दि. ०८ सप्टेंबर, २०१३.
४) शासन निर्णय क्र.एसजीए- २०१७/प्र.क्र.१८९/ कामगार-५, दि. ०८ सप्टेंबर, २०१७.
५) शासन निर्णय क्र.एसजीए- २०१८/प्र.क्र.९९/ कामगार-५, दि. १० ऑक्टोंबर, २०१८.
६) शासन निर्णय क्र.एसजीए- २०१८/प्र.क्र.९०२/ कामगार-५, दि. १३ फेब्रुवारी, २०१९.

प्रस्तावना :-

खाजगी एजन्सीमध्ये कार्यरत असलेल्या व त्यांचेमार्फत मुख्य मालकांकडे नियुक्त केलेल्या सुरक्षा रक्षकांना, सुरक्षा रक्षक मंडळाच्या सुरक्षा रक्षकांपेक्षा कमी नसलेले फायदे मिळत असल्यास अशा सुरक्षा रक्षकांना, महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ मधील कलम-२३ नुसार सुट मिळण्याची तरतूद आहे. खाजगी सुरक्षा रक्षक एजन्सीमार्फत विविध मुख्य मालकांकडे कार्यरत असलेल्या सुरक्षा रक्षकांना अशा प्रकारे सूट देण्याबाबतच्या प्रस्तावांवर कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने शासनाने संदर्भाधिन शासन निर्णयान्वये कार्यपध्दती वेळोवेळी निश्चित केली आहे.

खाजगी सुरक्षा रक्षकांना अधिनियमाचे संरक्षण व त्याअंतर्गत असलेले लाभ मिळणे आवश्यक आहे. त्याकरिता खाजगी सुरक्षा रक्षकांची नोंदणी होणे आवश्यक आहे. या संदर्भात दि.०९/०४/२०१८ रोजीच्या महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये खाजगी सुरक्षा रक्षकांना कलम २३ अन्वये सूट देण्याच्या कार्यपध्दतीबाबत चर्चा करण्यात आली. या कार्यपध्दतीमध्ये **"ज्या सुरक्षा रक्षक एजन्सीकडे, कार्यरत असलेल्या सर्व सुरक्षा रक्षकांसाठी सूट मिळण्याकरिता शासनाकडे अर्ज केलेले आहेत, अशा सुरक्षा रक्षकांना नियुक्त करणा-या एजन्सीकडून, सूट प्राप्ती करिता एजन्सीकडील कोणताही सुरक्षा रक्षक शिल्लक नाही व सूट प्राप्त झाल्याशिवाय त्यांना कोणत्याही सुरक्षा रक्षकास आस्थापना व कारखान्यामध्ये तैनात ठेवता येणार नाही व जर असे आढळल्यास सुरक्षा रक्षकांना दिलेली सूट रद्द करण्यात येईल"** असे "हमीपत्र" घेण्याची शिफारस समितीने केली आहे. यानुसार दि.८ सप्टेंबर, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीमध्ये खालील प्रमाणे बदल करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक ( नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ च्या कलम २३ अन्वये खाजगी सुरक्षा रक्षक एजन्सीमार्फत विविध मुख्य मालकांकडे कार्यरत असलेल्या खाजगी सुरक्षा रक्षकांना सुट देण्याचे संपूर्ण प्राधिकार हे शासनाचे आहेत. तथापि, उक्त अधिनियमाच्या तरतुदीनुसार खाजगी सुरक्षा रक्षकांना कायदयाचे संरक्षण व लाभ मिळण्याच्या दृष्टीने खाजगी सुरक्षा रक्षकांची नोंदणी करणे आवश्यक आहे. याकरिता कलम २३ अन्वये खाजगी सुरक्षा रक्षक एजन्सीमार्फत विविध आस्थापनामध्ये कार्यरत असलेल्या सुरक्षा रक्षकांना दयावयाच्या सुटबाबतचे प्रस्ताव सादर करताना प्रत्येक खाजगी सुरक्षा रक्षक एजन्सीकडून सोबत जोडलेल्या जोडपत्र-१ नुसार हमीपत्र ( Undertaking) रु.१००/ च्या बंधपत्रावर घेण्यात यावे.

प्रशासकीय सुलभता व उद्योग सुगमता याद्दष्टीने धोरण ( Ease of doing business) विचारात घेऊन शासनाने जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळातील कामकाजाकरिता संदर्भाधिन दि.१३/०२/२०१९ रोजीच्या शासन निर्णयाअन्वये संगणक प्रणाली विकसित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार प्रणाली (http://erp.sgbregistration.in) विकसित करण्यात आली आहे. या प्रणालीनुसार इतर कामकाजासह कलम-२३ अंतर्गत होणा-या कार्यवाहीसाठी ऑनलाईन पध्दत सुरु करण्यात आली आहे. सबब यापुढे कलम २३ अन्वये प्रस्ताव थेट न स्विकारता ऑनलाईन स्विकारावेत. तसेच सूट दिल्यानंतर सदर प्रणालीनुसार दिलेल्या प्रकरणामध्ये लेव्ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार आहे. अपवादात्मक परिस्थितीत मंडळाच्या बँक खात्यात RTGS, NFT व IMPS इ. मार्फत लेव्ही भरण्यास मुभा राहिल, याकरिता मंडळानी दर्शनी फलकावर त्याबाबत इत्यंभूत माहिती प्रसिध्द करावी.

अ) कलम-२३ अन्वये सुरक्षा रक्षक एजन्सी यांनी प्रस्ताव दाखल करताना दि.०८/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयामधील परिच्छेद-१ मध्ये नमुद केलेले अ.क्र. ५,६,७,८,९,१०,११ व १२ येथे नमूद कागदपत्र न जोडता फक्त त्यांचा तपशील प्रस्तावासोबत सादर करावा.

ब) दि. ०८/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयामधील परिच्छेद-२ मधील सुरक्षा रक्षक यांची यादी संगणक प्रणालीवर सादर करावी. तांत्रिकदृष्टयाअपवादात्मक परिस्थिती उद्भवल्यास सुरक्षा रक्षक यांच्या यादीची कागदोपत्री प्रत सादर करण्याची मुभा राहिल.

यापुढे वरील प्रमाणे प्राप्त झालेल्या प्रस्तावांची मंडळाने छाननी करुन, शासनाकडे प्रस्ताव सादर करताना प्रस्तावासोबत मंडळाचा अहवाल, परिच्छेद-४ प्रमाणपत्र, एजन्सीचे हमीपत्र, सुरक्षा रक्षक एजन्सीचा पसारा परवाना प्रत व सुरक्षा रक्षकांचे पोलीस पडताळणी अहवाल फक्त सादर करण्यात यावेत. जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाकडे संबंधित एजन्सीकडून प्राप्त झालेले प्रस्ताव वेळोवेळी दिलेल्या सुचनांनुसार न चुकता ३०

दिवसांच्या आत शासनाकडे सादर करावेत. मे. सेराईज टेक सोल्युशन्स प्रा.लि., प्रिस्टन वुडस् २९/ए, न्यू डी.पी. रोड, विशाल नगर, पिंपळे निलख, पिंपरी-चिंचवड, पुणे-४११ ०२७ यांनी वरील सुधारणांनुसार प्रणालीमध्ये आवश्यक त्या सुधारणा करणे आवश्यक राहील.

सदर आदेश हे महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक ( नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ चे कलम-८(४) अन्वये निर्गमित करण्यात येत आहे. सर्व सुरक्षा रक्षक मंडळांनी सदर कार्यपध्दतीबाबत त्यांच्या कार्यालयांतर्गत सुचना फलकावर प्रसिध्दी दयावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१९०९१७११४९०५९२१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Dr.Shrikant L. Pulkundwar

Digitally signed by Dr.Shrikant L. Pulkundwar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=feb24b5f5d1512bb47f7bae5ad1db4953358cd43c999bdf0814c6bb78364d50a, serialNumber=c10a1e6c8fbe08c1180978bd3ed8a151ed05202d522b09b9960341c2f080906d, cn=Dr.Shrikant L. Pulkundwar
Date: 2019.09.18 13:05:25 +05'30'

**( डॉ. श्रीकांत ल. पुलकुंडवार )**

शासनाचे उप सचिव

**प्रत :-**

१) मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.

२) मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.

३) प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक.

४) महाराष्ट्र राज्य, सुरक्षा रक्षक सल्लागार समितीने सर्व सन्माननीय सदस्य.

५) कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

६) सह आयुक्त (माथाडी), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

७) अध्यक्ष, सर्व सुरक्षा रक्षक मंडळे.

८) निवड नस्ती (कामगार-५).

## जोडपत्र-१

खाजगी सुरक्षा रक्षक एजन्सीमार्फत खाजगी सुरक्षा रक्षकांना महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक ( नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ च्या कलम २३ अन्वये सुट द्यावयाचे प्रस्तावासोबत सादर करावयाच्या हमीपत्राचा नमुना.

## हमीपत्राचा नमुना

" महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ च्या कलम २३ अंतर्गत आमच्या एजन्सीकडून कार्यरत असलेल्या सर्व सुरक्षा रक्षकांनी सुट प्राप्त करण्याकरिता मंडळाकडे/ शासनाकडे अर्ज सादर केलेले असून, सुट प्राप्तीकरिता आमच्याकडील कोणताही सुरक्षा रक्षक आता शिल्लक नाही व सुट प्राप्त झाल्याशिवाय कोणत्याही खाजगी सुरक्षा रक्षकांस कोणत्याही मुख्य मालकाच्या आस्थापनेत/ कारखान्यात तैनात ठेवता येणार नाही, आणि असे आढळल्यास आमच्या --------------------- या खाजगी सुरक्षा रक्षक एजन्सीच्या सुरक्षा रक्षकांना महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक ( नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९८१ च्या कलम-२३ अन्वये दिलेले सुट संदर्भातील आदेश / अधिसुचना शासनाकडून रद्द करण्यात येईल याची आम्हाला जाणीव आहे व तशी नोंद एजन्सीच्या स्तरावर घेण्यात आलेली आहे."